sanofi

18th April 2023

The Secretary,
Bombay Stock Exchange Limited
Phiroze Jeejeebhoy Towers
Dalal Street,
Mumbai - 400 001
Scrip Code: 500674

The Secretary,
The National Stock Exchange of India Limited
C-1, Block G, Exchange Plaza
Bandra-Kurla Complex
Bandra East, Mumbai - 400 050
Symbol: SANOFI

Newspaper Publication - Annual General Meeting through Video Conferencing Facility

Dear Sirs

Please find enclosed copies of the newspaper publication related to notice of the Annual General Meeting which will be held through video conferencing facility on 11th May 2023, published today i.e., 18th April 2023, in newspapers, Business Standard and Sakal.

For Sanofi India Limited

Radhika Kartik Shah
Digitally signed by Radhika Kartik Shah
Date: 2023.04.18 13:00:38 +05'30'

Radhika Shah
Company Secretary & Compliance Officer
Membership No: A19308

Railways dials Jio, Airtel for 1.1 million connections

DHRUVAKSH SAHA
New Delhi, 17 April

Telecom giants Reliance Jio and Bharti Airtel will provide new mobile connections to 1.1 million employees of Indian Railways across the country, after the two emerged as lowest bidders in the national transporter's expansion of the closed user group (CUG) scheme, *Business Standard* has learnt.

According to official documents, Jio will provide 728,000 SIM cards for a contract value of ₹126 crore, while Airtel will supply 485,000 sim cards for ₹84 crore. Airtel had emerged as the second-lowest bidder for the order, and got the contract after matching the bid of Jio, which was the lowest bidder.

Last year, the Indian Railways undertook a significant expansion of its CUG scheme, bringing more than 800,000 additional railway employees under its ambit. Earlier, Jio was the sole service provider for the national transporter, with connections provided for 322,000 employees, according to sources in the railways. "With increasing public investment in railway infrastructure, it was felt that more efficiency can be brought in railway operations by ensuring that every employee has a CUG connection, which can significantly reduce communication delays in crucial operations," a senior official told *Business Standard*.

"The enlarged CUG scheme managed by NWR (North Western Railway) shall come into effect from 13.04.2023 and shall replace the existing CUG scheme managed by RailTel Corporation of India," a letter issued by the Railway Board on April 12 said.

These connections have been divided into four separate plans, which will be allocated within railways on the basis of the grade of officials. Most of these new phone numbers will be allocated under 'Plan C', which is for Group C staff of the railways.

Due to the expansion in size of subscribers, the tariffs finalised under the latest policy are about 10 per cent lower than the previous rates charged by Jio, which will lead to savings per user for the railways. Questions to both Jio and Airtel remained unanswered till the time of publishing of this report.

Another benefit that the railways sees is increased connectivity in areas with typically poor network quality. "Since the new CUG connections will be provided to every employee in the country, operators have an incentive to establish telecom infrastructure in places usually ignored, since railway establishments cover even remote areas and hinterlands. This is likely to lead to better network connectivity for the common people in these areas as well," said the official quoted above.

The connections have been divided into four separate plans, which will be allocated within railways on the basis of the grade of officials

This paper had reported that the railways allowed private telcos to install towers on railway land, which is now likely to incentivise firms to establish this infrastructure near tracks and other establishments to meet their quality of service (QoS) commitments under the tender conditions.

The CUG scheme was started in 2002 to provide better communication facilities to officials at various operational levels. Since then, the scheme has been gradually expanded to increase the ambit of railway employees availing of special rate benefits and faster communication.

PLAN DETAILS

Pricing difference



Note: The 2023 contract has an additional provision for monthly rollover of data up to 500 GB

Details of bid

Service provider	No. of SIM cards	Value of contract (₹ cr)
Reliance Jio	728,400	126.9
Bharti Airtel	485,600	84.6

Source: Ministry of Railways

'Green hydrogen being a solution to everything a far-fetched idea'

ATANU MUKHERJEE, president and chief executive officer of US-based Dastur Energy, tells Subhayan Chakraborty in an interview that carbon capture, utilisation and storage (CCUS) technology offers the best solution to decarbonising existing industrial units over the next two decades. Edited excerpts:

Which industries can effectively capture carbon in India?

Oil & gas, coal and cement are the three key sectors that will drive the CCUS push. We are actively talking with public sector enterprises in the energy sector, such as NTPC, for a range of CCUS tech and Coal India for gasification technology. We have also had discussions with SAIL, and had conducted a feasibility study for CCUS at IOCL's Koyali refinery in Vadodara, Gujarat.

How does coal fit into the carbon capture story?

We are focusing on coal because it's the most likely thing to do. One of the ways to make coal clean is through coal gascification, which also produces CO2 in a concentrated form. This can be easily captured, and stored or utilised. Coal will continue to be a primary source of energy in electricity generation. Carbon can also be captured from the flue gas created in the process.

Also, coal is used as a fuel in steel and cement production. Since there isn't significant amount of scrap-based or gas-powered steelmaking in India, coal will continue to be used. Over the past 10 years, India has significantly invested in blast furnace based steelmaking. As a result, these factories and power plants can't be shut down. Therefore, they have to be retrofitted with carbon capture technology. That's the best solution for the next 10-20 years.

Given that CCUS tech is costly, how can the government realistically fund it on a large scale?

There is an inherent cost in CCUS, but there is also a significant opportunity in accessing low cost funds that are available internationally

In a study that we did for NITI Aayog, we have proposed a model to finance CCUS tech. We have suggested the creation of a body called the Carbon Capture Finance Corporation. The CCFC will be funded by low-cost sovereign or International Green Funds, Carbon Bonds or Climate Funds. By investing in CCUS projects, along with the utilisation of a part of the incremental tax revenue generated, it should be possible to fund the carbon capture credits, eventually leading to subsidy-neutral CCUS operations.

Is CCUS tech competing with alternative fuels such as green hydrogen for funds and attention?

First of all, you know, green hydrogen can only solve a certain set of problems. Producing green hydrogen requires a fully renewable source of electricity. That is not possible today. Also the cost of production is very high at $5.5-6 per kg. At that price, no industrial mechanism or tools can viably produce anything with fuel which is so expensive.

As a result, its not possible to produce it at a massive scale. So, green hydrogen being a solution to everything is a far-fetched idea. It is a part of the solutions for the future which we need to invest now. But it is nowhere near what people think of it.

'Export obligation fulfilment can start from date of issue of EPCG authorisation'

Our JDGFT, Coimbatore office, says that under the EPCG scheme, only exports done after installation of capital goods would be considered for discharge of the export obligation (EO). Is this correct?

No. There is no such stipulation in the FTP or in the related Customs notification. The export obligation period starts from the date of issue of EPCG authorisation, and so the right to export towards fulfilment of the export obligation should also start from the date of issue of the authorisation. In fact, Explanation (C)(I) in the related Customs notification 16/2015-Cus dated April 1, 2015 (now 26/2023-Cus dated April 1, 2023) says that "export obligation" means the obligation on the importer to export out of India goods manufactured, or capable of being manufactured, or services rendered by the use of capital goods imported in terms of this notification. So, you can export goods capable of being manufactured by the use of capital goods imported under the EPCG scheme. It implies that whether the exports are done before or after the installation of capital goods is not relevant at all.

CHATROOM
T N C RAJAGOPALAN

Our bank received the inward remittance towards payment of our export bill, but due to some internal disruptions, delayed crediting our account by over a week. Is there any way we can ask them to compensate for the delay and, if so, on what basis?

Yes. You can seek compensation on the basis of Rule 2.5 of the FEDAI (Foreign Exchange Dealers Association of India) Rules, 2019. It says that on receipt of credit advice/statement of the Nostro account and compliances with guidelines, requirements of the Bank and FEMA, the Bank shall transfer funds for the credit of the exporter's account within two working days. If the above time limit is not observed, the Bank shall pay compensation for the delayed period at the minimum interest rate charged on export credit; compensation for adverse exchange rate movement, if any, shall also be paid per the bank's compensation policy.

We had obtained advance authorisations under Para 4.07 of HBP 2015-20 and got ad hoc norms fixed by the Norms Committee (NC) also. Now, Para 4.12 (vi) of HBP 2023 says that norms ratified by any NC in the O/o DGFT on or after April 1, 2023, in respect of any advance authorisation obtained under paragraph 4.07, will be valid for a period of three years from the date of ratification. Does it mean that for norms letters received before April 1, 2023, we cannot consider applying for advance authorisations on a repeat basis?

In my opinion, Para 4.12 (vi) of HBP 2015-20 will continue to hold good, where the validity of ad hoc norms fixed was two years from the date of ratification, and the same applicant exporter was allowed to avail of advance authorisations on a repeat basis. So, for norms notified before April 1, 2023, the two-year time limit will apply. The change is that for norms notified after April 1, 2023, a three year-time limit will apply.

Business Standard invites readers' SME queries related to GST, export and import matters. You can write to us at smechat@bsmail.in

जगदीश शेट्टर अखेर काँग्रेसनिवासी

वरिष्ठ नेत्यांच्या चर्चेनंतर पक्षात प्रवेश; सक्षम नेते असल्याचा गौरव

रण कर्नाटकचे

बंगळूर : कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री जगदीश शेट्टर यांचे काँग्रेसमध्ये पक्षाचा ध्वज देऊन स्वागत करताना पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे. (डावीकडून) सिद्धरामय्या, डी. के. शिवकुमार तसेच के. सी. वेणुगोपाल, पवन खेडा आदी वरिष्ठ नेते याप्रसंगी उपस्थित होते.

बंगळूर, ता. १७ (पीटीआय) : कर्नाटकमधील भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री जगदीश शेट्टर यांनी सोमवारी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. सहा वेळा आमदार म्हणून निवडून आलेल्या शेट्टर (वय ६७) यांना भाजपने यंदा उमेदवारी दिली नाही. त्यामुळे त्यांनी काल पक्षाचा राजीनामा दिला होता. तेव्हापासून शेट्टर काँग्रेसमध्ये जातील, असा अंदाज व्यक्त करण्यात येत होता. ते हुबळी-धारवाड मध्य मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास इच्छुक होते. पण भाजपने त्यांना उमेदवारी नाकारल्याने ते नाराज झाले होते. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, सरचिटणीस के.सी.वेणुगोपाल, कर्नाटकचे प्रभारी रणदीप सुरजेवाला, कर्नाटक काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष डी.के. शिवकुमार आणि माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या आदींच्या उपस्थितीत त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

भाजपने तिकीट नाकारून त्यांना अपमानित केल्याचा आरोप शेट्टर यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर केला. हा पक्ष काही निवडक लोकांच्या ताब्यात आहे. मी बांधणी केलेल्या पक्षातून मला जबरदस्तीने हाकलून देण्यात आले. काँग्रेसची विचारधारा आणि तत्त्वे स्वीकारून मी या पक्षात प्रवेश करीत आहे, असेही त्यांनी सांगितले. हुबळीहून काल रात्री बंगळूरला आल्यानंतर शेट्टर यांनी काँग्रेसचे नेत्यांसह प्रचार समितीचे प्रमुख एम.बी. पाटील आणि ज्येष्ठ नेते श्यामनूर शिवशंकरअप्पा (शेट्टर यांचे नातेवाईक) यांच्याशी चर्चा केली होती.

शेट्टर यांच्या प्रवेशावेळी खर्गे म्हणाले, की मला जगदीश शेट्टर यांच्याबद्दल अधिक परिचय देण्याची गरज नाही. त्यांच्या प्रवेशाने काँग्रेस अधिक बळकट होणार आहे. ते स्वतः विजयी होतातच, पण अन्य जागा निवडून आणण्यातही ते सक्षम आहेत. ''जगदीश शेट्टर यांच्याकडून कोणतीही मागणी होणार नाही अन आम्हीहा त्यांना काही देण्याचे मान्य केलेले नाही. आम्हाला देश एकसंध ठेवायचा आहे आणि केवळ काँग्रेसच हे करू शकते,'' असा दावा डी.के. शिवकुमार यांनी पत्रकारांशी बोलताना केला.

''माजी मुख्यमंत्री, माजी उपमुख्यमंत्री किंवा कोणी खासदार आमच्याबरोबर येण्यास इच्छुक असतील तर मी त्या सर्वांचे स्वागत करतो.
- डी.के. शिवकुमार, प्रदेश अध्यक्ष, काँग्रेस

''हा कर्नाटकच्या राजकारणात मोठा बदल आहे. माजी मुख्यमंत्री आणि राज्यातील आदरणीय नेते जगदीश शेट्टर यांनी आज काँग्रेसमध्ये प्रवेश केला. कर्नाटकमध्ये काँग्रेस बहुमताने सरकार स्थापन करण्याच्या मार्गावर असून पत्याच्या बंगल्याप्रमाणे भाजप कोसळणार आहे.''
- जयराम रमेश, सरचिटणीस, काँग्रेस

'राहुल गांधी दोषारोपावर उत्तर दिलेले नाही'

बंगळूर : 'काँग्रेस नेत्यांनी त्यांच्या भ्रष्टाचारासंबंधीच्या दोषारोपपत्रावर अद्याप उत्तर दिलेले नाही', असे प्रत्युत्तर कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी राहुल गांधी यांना सोमवारी दिले. कोलारमधील सभेत काल राहुल गांधी यांनी '४० टक्के कमिशन सरकार,' अशी टीका बोम्मई सरकारवर टीका केली होती. त्याला आज बोम्मई यांनी प्रत्युत्तर दिले. काँग्रेस कर्नाटकात सत्तेवर येणार असल्याचा राहुल यांचा दावाही त्यांनी फेटाळला. ''कर्नाटकमधील खरी वस्तुस्थिती त्यांना माहीत तरी आहे का, असा सवाल करीत बोम्मई म्हणाले, राज्यातील काँग्रेस सरकारच्या काळात झालेल्या भ्रष्टाचाराबद्दल मी राहुल गांधी यांना 'भारत जोडो यात्रे' दरम्यान दोषारोपपत्र पाठविले होते. त्यावर त्यांनी अद्याप उत्तर दिलेले नाही.''

शेट्टर यांनी पुन्हा भाजपमध्ये यावे : ईश्वरप्पा

शिमोगा : कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री जगदीश शेट्टर यांचा काँग्रेस प्रवेश निराशाजनक असल्याचे सांगत त्यांनी या निर्णयाचा फेरविचार करावा आणि पुन्हा भाजपमध्ये यावे, असे आवाहन माजी मंत्री के. एस. ईश्वरप्पा यांनी सोमवारी केले. ते म्हणाले, ''शेट्टर यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याचे खुल्या पत्राद्वारे कळविले आहे. अन्य पक्षातून भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांबद्दल आणि राजकीय फायद्यासाठी पक्ष सोडणाऱ्यांबद्दल मी काही बोलणार नाही. पण शेट्टर हे अनेक दशकांपासून भाजपमध्ये होते. पक्षाच्या विचारसरणीशी त्यांचे कुटुंबीय निगडीत आहे. शेट्टर केवळ सत्तेसाठी पक्ष सोडतील, असे मला कधी वाटलेच नाही.''

जवानाचा वैयक्तिक वैरातून चौघांवर हल्ला

चंडीगड, ता. १७ (पीटीआय) : भटिंडा लष्करी तळावरील गोळीबारप्रकरणी एका जवानास अटक केली असून देसाई मोहन असे त्याचे नाव आहे. १२ एप्रिल रोजी केलेल्या गोळीबारात चार जवानांचा मृत्यू झाला होता. वैयक्तिक कारणावरून त्याने गोळीबार केला आणि त्याचे त्यांच्याशी वैर होते, असे भटिंडा वरिष्ठ पोलिस अधीक्षक गुलनीत सिंग खुराणा यांनी सांगितले.

सागर बन्ने, कमलेश आर. योगेश कुमार जे आणि संतोषकुमार नागराल असे मृत्युमुखी पडलेल्या जवानांची नावे आहेत. या घटनेनंतर आरोपीने चौकशी अधिकाऱ्यांची दिशाभूल केली. त्याने चौकशीत काही संशयित लोकांना पाहिले आणि जंगलात पळून गेल्याचे सांगितले. प्रत्यक्षात असे काहीच घडले नव्हते. त्याची चौकशी सुरू केली असता त्यातील बनावटपणा हळूहळू उघडकीस आला. गुलनीत सिंग म्हणाले, की आरोपीने एलएमजी रायफलचे आठ काडतूस, इन्सास रायफल आणि वीस काडतूस असलेली मॅगझीन चोरली होती. गोळीबारात वापरलेली शस्त्रे पोलिसांनी हस्तगत केली आहेत. आता आरोपीच्या मोबाईल फोनची न्यायवैद्यक चौकशी केली जात आहे. आरोपी जवान हा अविवाहित असून ज्यांची हत्या केली, ते देखील अविवाहित होते. देसाई मोहनने या गोळीबाराची सर्वप्रथम माहिती मेजर आशुतोष शुक्ला यांना दिली. तो म्हणाला, की १२ एप्रिल रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास मेसच्या बॅराकमध्ये गोळीबार झाला असून तेथे दोन संशयित हल्लेखोरांनी गोळीबार केला आहे. त्यांनी पांढरा कुर्ता आणि पायजमा घातला होता आणि चेहराही झाकला होता. मला पाहून ते जंगलाच्या दिशेने पळून गेले, असेही देसाई मोहन याने मेजर शुक्ला यांना सांगितले.

भाजप-संघाकडून द्वेष पसरवला जातोय!

भालकी : काँग्रेस उमेदवाराच्या प्रचारार्थ सोमवारी आयोजित सभेसाठी काँग्रेस नेते राहुल गांधी दाखल झाले असता स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून स्वागत करण्यात आले.

भालकी (कर्नाटक), ता. १७ (पीटीआय): भाजप आणि संघ परिवारामुळे लोकशाही संकटात सापडली असून देशात द्वेषाचे आणि हिंसेचे वातावरण पसरविले जात असल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज केला. येत्या दहा मे रोजी विधानसभेच्या निवडणुका होत असून जनतेने काँग्रेस पक्षाला भरभरून पाठिंबा द्यावा, असे आवाहन करत पक्षाला दीडशेपेक्षा अधिक जागा मिळाल्यास तर काँग्रेस पक्ष बहुमतासह कर्नाटकात सरकार स्थापन करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बिदर जिल्ह्यातील भालकी येथे काँग्रेस उमेदवाराच्या प्रचारार्थ आयोजित सभेत राहुल गांधी बोलत होते. स्थानिक नेत्यांनी राहुल गांधी यांचे स्वागत केले. यावेळी काँग्रेसचे सरचिटणीस के.सी. वेणुगोपाल, प्रभारी रणदिप सिंह सुरजेवाला यांची उपस्थिती होती. या ठिकाणी प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष ईश्वर खांद्रे निवडणूक लढवत आहेत. राहुल गांधी यांनी भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली. ते म्हणाले, की मोदी यांनी देशातील प्रत्येक नागरिकांना पंधरा लाख रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. हे पैसे आपल्या खात्यात जमा झाले का? असा सवाल जनतेला केला. आम्ही भाजपप्रमाणे खोटे आश्वासन देऊ इच्छित नाही. सत्तेवर येताच काँग्रेस आपले आश्वासन पूर्ण करेल, असा विश्वास व्यक्त केला. बसवण्णा यांनी देशात पहिल्यांदा लोकशाहीचा मार्ग सांगितला. आज संपूर्ण देशात संघ आणि भाजपकडून लोकशाहीवर हल्ले होत आहेत. संघ आणि भाजपचे कार्यकर्ते देशात द्वेषाची आणि हिंसा पसरवत आहेत. असा आरोप राहुल यांनी केला. कर्नाटकात काँग्रेसचे सरकार स्थापन झाल्यास पहिल्याच कॅबिनेट बैठकीत जाहीरनाम्यातील आश्वासनांची पूर्तता केली जाईल, असे ते म्हणाले.

दृष्टिक्षेपात

दक्षिण चिनी समुद्रात अमेरिकेने धाडलेली यूएसएस मिलीयस क्षेपणास्त्रभेदी युद्धनौका. या युद्धनौकेने तैवानच्या सामुद्रधुनीतूनही मार्गक्रमण केले. (एएफपी)

अमेरिकी युद्धनौका तैवानच्या सामुद्रधुनीत

तैपेई सिटी : तैवानला घेरण्याचा लष्करी सराव करण्याच्या चीनच्या कृत्यानंतर अमेरिकेने तातडीने प्रत्यूत्तर दिले आहे. तैवानच्या सामुद्रधुनीत युएसएस मिलीयस ही क्षेपणास्त्रभेदी युद्धनौका धाडत तैवानच्या बचावासाठी कटिबद्ध असल्याची भूमिका अमेरिकेने अधोरेखित केली. युद्धनौकेचे मार्गक्रमण हा नेहमीच्या सरावाचा एक भाग असल्याचा तसेच हा मार्ग कोणत्याही देशाच्या सागरी हद्दीच्या पलिकडे असल्याचा दावाही अमेरिकेने केला. तैवानच्या अध्यक्षा त्साई इंग-वेन यांनी अमेरिका दौऱ्यात अमेरिकी संसदेचे सभापती केव्हिन मॅक्कार्थी यांची भेट घेतली. यास प्रत्यूत्तर म्हणून चीनने असा लष्करी सराव करताना हवाई तसेच सागरी मार्गांचा अवलंब केला.

उत्तर कोरियालाही इशारा

सोल : क्षेपणास्त्र चाचण्यांचा सपाटा लावलेल्या उत्तर कोरियाला इशारा देण्यासाठी अमेरिका, दक्षिण कोरिया आणि जपान या देशांनी सोमवारी कोरियन द्विपकल्पाजवळील समुद्रात संयुक्त लष्करी सराव केला. यात क्षेपणास्त्र संरक्षण क्षमता वृद्धिंगत करण्यावर भर देण्यात आला. या तीन देशांच्या संयुक्त सरावानंतर उत्तर कोरिया आक्रमक प्रत्यूत्तर देण्याचीच अपेक्षा आहे. ताबा घेण्याचा सराव म्हणूनच अमेरिका आशियामधील आमच्या शेजारी देशांसह असा सराव करीत असल्याचा आक्षेप उत्तर कोरियाने घेतला आहे.

नवाझ शरीफ पाकमध्ये येणार

इस्लामाबाद : पाकिस्तानमध्ये सर्वसाधारण निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर पीएमएल-एन पक्षाचे प्रमुख आणि माजी पंतप्रधान नवाझ शरीफ लंडनहून लवकरात लवकर पाकमध्ये परततील, असे पाकिस्तानचे अंतर्गत मंत्री राना सनानुल्लाह यांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही पाकमधील राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या पंजाब प्रांतात १४ मे रोजी निवडणुका होणार नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

'साईड इफेक्ट'वर नामी उतारा

नवी दिल्ली, ता. १७ : प्रतिजैविक (ॲन्टीबायोटीक्स) औषधांच्या वापरामुळे मानवी शरीरावर दुष्परिणाम (साईड इफेक्ट) होण्याची शक्यता असते. त्यासाठी संरक्षणात्मक उपाय म्हणून शास्त्रज्ञांनी एक नामी उतारा शोधला असून, त्यामुळे प्रतिजैविकांचे दुष्परिणाम तर कमी होतात त्याचबरोबर त्यांची कार्यक्षमता कायम राहते.

'नेचर' या आंतरराष्ट्रीय शोध पत्रिकेत तब्बल १४४ प्रतिजैविकांसंबंधी संशोधन प्रसिद्ध केले आहे. ज्यामध्ये अतिसुक्ष्म आतड्यांतील जीवाणूंच्या वाढीवर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण केले आहे. डेन्मार्क येथील कोपनहेगन शहरात पार पडलेल्या 'युरोपीयन काँग्रेस ऑफ क्लिनिकल मायक्रोबायोलॉजी अँड इन्फेक्शियस डिसीजेस' मध्ये हा शोधनिबंध सादर करण्यात आला. ज्यामुळे आतड्यांच्या मायक्रोबायोमवरील प्रतिजैविक उपचारांचे प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी दृष्टीकोन प्राप्त झाला आहे. प्रमुख संशोधक उल्रिक लोबर सांगतात, ''प्रतिजैविकांचे दुष्परिणाम रोखण्यासाठी शास्त्रज्ञांना अभिनव दृष्टीकोन मिळाला आहे. ज्यामुळे आतड्यांतील मायक्रोबायोमला निरोगी ठेवण्यास मदत होते व प्रतिजैविकांचे हानिकारक दुष्परिणाम कमी होतात.''

संशोधनाचे महत्त्व...

मानवी शरीरातील पचनास, चयापचय क्रियेस, पोषण प्रक्रियेस आणि रोगप्रतिकारक शक्तीसाठी आतड्यांवरील कोट्यवधी सूक्ष्मजीव मदत करतात. प्रतिजैविके या सूक्ष्मजीवांना नुकसान पोहोचवू शकतात. परिणामी असंतुलन निर्माण होत 'क्लोस्ट्रिडियोइड्स डिफिफिल इन्फेक्शन्स'मुळे वारंवार होणारी जठरोगविषयक समस्या तसेच लठ्ठपणा, ॲलर्जी, दमा आदी दीर्घकालीन आरोग्य समस्या उद्भवू शकतात. त्यासाठी प्रतिजैविकांचे दुष्परिणाम रोखणे गरजेचे होते.

संशोधन काय ?

- १४४ प्रतिजैविकांच्या उपचारानंतर मानवी आतड्यांत आढळणाऱ्या २७ जीवाणू प्रजातींच्या वाढीचे विश्लेषण केले.
- यासाठी ८०० हून अधिक प्रतिजैविक व जीवाणू संयोगांचा अभ्यास करण्यात आला.
- जीवाणूंची वाढ रोखण्यासाठी आवश्यक प्रतिजैविकांची किमान एकाग्रता (एमआयसी) तपासण्यात आली.
- बहुतेक आतड्यांतील जीवाणूंमध्ये रोग निर्माण करणाऱ्या जीवाणूंपेक्षा किंचित जास्त एमआयसी होते. जे सामान्य स्थिती दर्शवितात.
- मात्र, क्लासस्टेट्रासाइक्लिन आणि मॅक्रोलाइड्स या प्रतिजैविकांनी चांगल्या जीवाणूंची वाढ थांबवली.

कोरोना रुग्णांच्या संख्येत घसरण

नवी दिल्ली, १७ (पीटीआय): देशातील कोरोना रुग्णांच्या संख्येत सलग तिसऱ्या दिवशी घसरण पाहावयास मिळाली आहे. देशभरात गेल्या चोवीस तासात ९१११ नव्या कोरोना रुग्णांची नोंद झाली असून सक्रिय रुग्णांची संख्या ६०,३१३ वर पोचली आहे. यासंदर्भातील माहिती आरोग्य मंत्रालयाने दिली. गेल्या चोवीस तासात कोरोनामुळे २७ जण मृत्युमुखी पडले आहेत.

देशात चोवीस तासांत गुजरातमध्ये ४ जण, उत्तर प्रदेशात चार जण दिल्ली आणि राजस्थानात प्रत्येकी तीन जण तर महाराष्ट्रात दोन, बिहार, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, झारखंड, केरळ आणि तमिळनाडूत प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, शनिवारी १०,९३०० आणि शुक्रवारी १०,७५३ नवीन रुग्ण आढळून आले होते. तसेच यापूर्वी सर्वाधिक रुग्ण १३ एप्रिल रोजी ११ हजारापेक्षा अधिक रुग्ण आढळून आले

अतीकप्रकरणी 'एसआयटी'

शस्त्रास्त्रे पुरवणाऱ्या दोघांचा पोलिसांकडून शोध सुरू

लखनौ, ता.१७ (पीटीआय) : अतीक अहमद आणि त्याचा भाऊ अश्रफ याच्या खूनप्रकरणी उत्तर प्रदेश पोलिसांनी तीन सदस्याचा समावेश असलेल्या विशेष तपास पथकाची(एसआयटी) स्थापना केल्याची माहिती पोलिसांच्या वतीने सोमवारी देण्यात आली.

उत्तर प्रदेशचे पोलिस महासंचालक आर. के. विश्वकर्मा यांच्यावतीने प्रसिद्ध केलेल्या निवेदनाचा संदर्भ देत, विशेष पोलिस महासंचालक प्रशांत कुमार यांनी, अतीक अहमद आणि अश्रफ याच्या खूनप्रकरणी एसआयटी स्थापन केल्याची माहिती दिली.

या एसआयटीचे नेतृत्व प्रयागराजचे अतिरिक्त पोलिस महासंचालकांकडे असणार आहे. तर प्रयागराजचे पोलिस आयुक्त आणि लखनौच्या न्यायवैद्यक प्रयोगशाळेचे संचालक यांचा या एसआयटीमध्ये समावेश करण्यात आला आहे. या एसआयटीच्या देखरेखीखाली या खूनाचा सखोल तपास केला जाणार आहे. तसेच ठराविक कालमर्यादेत तपास पूर्ण करण्याचे देखील उद्दिष्ट ठेवले आहे. दरम्यान, याप्रकरणातील तिन्ही हल्लेखोरांना प्रयागराज येथील तुरुंगातून प्रतापगढ येथील तुरुंगामध्ये हलविण्यात आले आहे.

हा सर्व पूर्वनियोजित कटच : तेजस्वी

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी अतीक आणि अश्रफ यांच्या खुनावरून योगी सरकारवर टीका केली आहे. योगी सरकारवर टीका करताना उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव म्हणाले की, ''ज्या पद्धतीने हा खून झाला त्यावरून हे सर्व पूर्व नियोजित होते हे लक्षात येते. मला कोणत्याही गुन्हेगाराबाबत सहानुभूती मुळीच नाही. उत्तर प्रदेशात जे काही झाले ती अतीकची नव्हे तर कायद्याची अंत्ययात्रा होती.''

बदलाचे दूरगामी परिणाम | याचिकांत 'शहरी उच्चभ्रूं'चा दृष्टिकोन ; न्यायालयाने स्वतःला दूर ठेवावे

समलिंगी विवाहाला केंद्राचा विरोध

नवी दिल्ली, ता. १७ (पीटीआय) : समलिंगी विवाहाला कायदेशीर मान्यता देण्याची मागणी करणाऱ्या याचिकांमधून केवळ शहरी उच्चभ्रू वर्गाचा दृष्टिकोन प्रतिबिंबित होतो. विवाहाला मान्यता हा कायदेमंडळाच्या कक्षेतील भाग असल्याने याबाबत निर्णय घेण्यापासून न्यायालयाने स्वतःला दूर ठेवावे, असे स्पष्ट मत केंद्र सरकारने आज सर्वोच्च न्यायालयामध्ये मांडले.

या अनुषंगाने सादर करण्यात आलेल्या याचिकांच्या गुणवत्तेवर देखील केंद्र सरकारकडून प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. केवळ सामाजिक स्वीकारार्हतेच्या दृष्टिकोनातून शहरी उच्चभ्रू वर्गाचा दृष्टिकोन याबाबतच्या याचिकांमधून मांडण्यात आला आहे. यासंबंधीच्या कायद्याचा विचार केला तर आपल्याला त्याकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून पाहावे लागेल. ग्रामीण, निम- ग्रामीण आणि नागरी भागातील लोकांचे काय म्हणणे आहे? ते जाणून घ्यायला हवे. वैयक्तिक कायद्यांचा विचार करून धार्मिक मतमतांतरे याबाबतच्या रूढी आणि परंपरा यांचा देखील विचार केला जायला हवा कारण त्या बदलाचे दूरगामी परिणाम संभवतात असेही केंद्र सरकारकडून सांगण्यात आले. समलिंगी विवाहाला कायदेशीर मान्यता देण्यात यावी अशी मागणी करणाऱ्या अनेक याचिका या सर्वोच्च न्यायालयामध्ये सादर झाल्या असून त्यावर आपली बाजू मांडण्यासाठी केंद्र सरकारकडून सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले. सगळ्या धर्मांमध्ये विवाहाला एक संस्कार मानण्यात आले असून त्यामध्ये हिंदू आणि इस्लामचाही समावेश होते. त्यामुळेच याबाबतच्या याचिका रद्द करण्यात याव्यात अशी मागणी केंद्राकडून करण्यात आली.

केंद्र सरकार म्हणाले...

- समलिंगी विवाहाबाबत लोकप्रतिनिधींना निर्णय घेऊ द्या
- कायदे मंडळ नव्या सामाजिक संस्थांना ओळख देऊ शकते
- समलिंगी विवाहामुळे सामाजिक संतुलन बिघडू शकते
- याबाबतच्या कायद्याचे दूरगामी परिणाम होतील
- न्यायपालिका एका कायद्याला पुन्हा लिहू पाहते आहे

आज सुनावणी होणार

समलिंगी विवाहाला कायदेशीर मान्यता देण्यात यावी अशी मागणी करणाऱ्या पंधरा याचिका सर्वोच्च न्यायालयामध्ये सादर झाल्या आहेत. तत्पूर्वी या याचिकांवर सुनावणी करताना तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने त्या सुनावणीसाठी पाच न्यायाधीशांच्या पीठाकडे वर्ग केल्या होत्या. आता त्यावर उद्या (ता.१८) सुनावणी होण्याची शक्यता आहे.



हाँगकाँगचे कार्यकर्ते वोंग यांना तीन महिन्यांचा कारावास

हाँगकाँग, ता. १७ (वृत्तसंस्था) : न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याच्या कारणावरून हाँगकाँगचे लोकशाहीवादी कार्यकर्ते जोशुआ वोंग यांना तीन महिन्यांच्या कारावासाची सजा ठोठावण्यात आली आहे.

सरकारच्या विरोधात २०१९ मध्ये आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी एका पोलिस अधिकाऱ्याची वैयक्तिक माहिती उघड केल्याचा ठपका वोंग यांच्यावर ठेवण्यात आला. न्यायालयाने अशी माहिती उघड करण्यावर बंदी घातली होती. वोंग हे याआधीच तुरुंगात आहेत. त्यांच्यावर वेगवेगळे निर्बंध मोडल्याचे अनेक आरोप ठेवण्यात आले आहेत. वेगवेगळ्या निर्बंधांचा भंग केल्याचे आरोप त्यांच्यावर आहेत. वोंग २०१४ मध्ये लोकशाहीवादी निदर्शनांमुळे प्रकाशझोतात आले.